**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. प्रफुल्ल भालचंद्र चमकले
६०८, ई, शाहूपुरी, १ ली गल्ली, कोल्हापूर-१ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा — उत्तरवादी
तहसीलदार, हातकणंगले, ता. हातकणंगले,जि.कोल्हापूर

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
हातकणंगले, ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७८ / कोल्हापूर /२००७ |
| २ | सुनावणीची तारीख | ९.७.२००८ |

३. **उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. प्रफुल्ल भालचंद्र चमकले
६०८, ई, शाहूपुरी, १ ली गल्ली, कोल्हापूर-१

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, हातकणंगले जि.कोल्हापूर
श्री. सतीश बागल

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, हातकणंगले,
ता.हातकणंगले, जि. कोल्हापूर
श्री. रणजित पांडुरंग देसाई

**मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

आयुक्त, पुणे यांच्या RTS/२२/९० दि. १७.०५.२००२ च्या हुकुमामध्ये खाडाखोड करून मौजे हेर्ले येथे डायरी नं.७००२ केल्याबाबत, तसेच डायरी नं.७००२ मध्ये प्रतिवादी म्हणून श्रीमती श्रीमंतीबाई रामचंद्र पाटील व श्री. प्रकाश पाटील यांची नावे असताना ती बदलली आहेत, त्याबाबत खुलासा, नावात बदल कोणत्या कायद्यान्वये केला त्याबाबत माहिती, तसेच मौजे हेर्ले येथील डायरी नं.७००२ मध्ये कोणत्या शासकीय कर्मचाऱ्यांचे हितसंबंधामुळे डायरी केली त्या सर्व कर्मचाऱ्यांची नावे, पदनाम व इतर अनुषंगिक माहिती

## विवेचन

मौजे हेर्ले, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर येथील डायरी नं. ७००२ मध्ये खाडाखोड केल्याच्या संदर्भात आठ मुद्दयांचा खुलासा मागणारा अर्ज अपीलकर्ता श्री. प्रफुल भालचंद्र चमकले यांनी जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, हातकणंगले यांच्याकडे केला होता. जन माहिती अधिकाऱ्यांनी विहित मुदतीपेक्षा ५ दिवस विलंबाने आपल्याला माहिती दिली, तसेच ती अपुरी व दिशाभूल करणारी आहे, म्हणून आपण केलेले अपील अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, हातकणंगले यांनी फेटाळले. वकिलांचा सल्ला घ्यावा व योग्य त्या न्यायालयात दाद मागावी, अशा स्वरूपाचा सल्ला देण्याचा जन माहिती अधिकाऱ्यांना अधिकार नाही, तरी त्यांनी तो दिला आहे, असे नमूद करून श्री. चमकले यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

आयोगाने दि. १३.५.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. उभय बाजूंमध्ये एकमत न झाल्याने दि.९.७.२००८ रोजी अपिलाची सुनावणी घेण्यात आली.

अपीलकर्त्याला विहित मुदतीत संपूर्ण माहिती देण्यात आली होती, परंतु दोन दिवस सुट्टी व एका दिवशी अपीलकर्त्याचे घर बंद असल्यामुळे माहिती देण्यास प्रत्यक्ष दोन दिवस विलंब झाला. अपीलकर्त्याचा दि. १०.४.२००७ चा अर्ज दि. १७.४.२००७ रोजी प्राप्त झाला. दि. ११.५.२००७ रोजी गाव कामगार तलाठी, हेर्ले यांच्यामार्फत माहिती पाठविण्यात आली. अजूनही काही माहिती हवी असल्यास देण्याची तयारी आहे, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात नमूद केले आहे. मात्र आपल्याला अद्यापही माहिती मिळाली नसल्यामुळे जन माहिती अधिकाऱ्यांना शास्ती व्हावी, असे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले आहे.

उभय बाजूंनी प्रपत्रामधील नोंदीचा पुनरूच्चार आयोगापुढील सुनावणीत केला. तत्कालीन अपिलीय प्राधिकाऱ्यांनी जन माहिती अधिकाऱ्यांची कार्यवाही योग्य ठरविली व मूळ प्रकरणातील दि. २५.१०.२००४ च्या प्रलंबित अर्जावर तात्काळ कार्यवाही करण्याचे आदेशही हक्क नोंद संकलन व निवासी नायब तहसीलदार यांना दिले. त्यानुसार कार्यवाही झालेली आहे. विभागीय आयुक्त, पुणे यांच्यापुढील प्रकरणात प्रतिवादीच्या नावात टंकलेखनात चूक झाली होती, त्याची संपूर्ण माहिती अपीलकर्त्यास दिली आहे, असे

जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार श्री. रणजित पांडुरंग देसाई व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, हातकणंगले श्री. सतिश बागल यांनी नमूद केले.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे पाहता श्री. चमकले यांच्या अर्जातील सर्व मुद्दे हे - 'असे करता येते का,' 'कोणत्या शासकीय कर्मचाऱ्यांच्या हितसंबंधामुळे डायरी केली', 'फौजदारी कायद्याचा भंग केला, असे माझे ठाम मत आहे, आपले मत कळवावे', अशा स्वरूपाचे आहेत. 'प्रतिवादी, तलाठी हेर्ले, मंडल अधिकारी, हेर्ले व तहसीलदार, हातकणंगले या सर्वांनी कटकारस्थान करून वरील डायरी घातल्याचे दिसून येत आहे, याबाबत लेखी खुलासा करावा,' अशा स्वरूपाची विचारणा केली आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार ही 'माहिती' ठरत नाही. मत, खुलासा, भाष्य यांची मागणी या अधिनियमाअंतर्गत करता येत नाही. तरीही जन माहिती अधिकाऱ्यांनी सर्व मुद्दयांची उत्तरे दिलेली आहेत, मात्र 'वकिलांचा सल्ला घ्या', किंवा 'न्यायालयात जा', असा सल्ला त्यांनी संदर्भानुसार दिला असला तरी न देणे अधिक उचित ठरले असते.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १० .८.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. प्रफुल्ल भालचंद्र चमकले
६०८, ई, शाहूपुरी, १ ली गल्ली, कोल्हापूर-१ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा — उत्तरवादी
तहसीलदार, हातकणंगले, ता. हातकणंगले,जि.कोल्हापूर

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
हातकणंगले, ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७८ / कोल्हापूर /२००७ |
| २ | सुनावणीची तारीख | ९.७.२००८ |

३. **उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. प्रफुल्ल भालचंद्र चमकले
६०८, ई, शाहूपुरी, १ ली गल्ली, कोल्हापूर-१

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, हातकणंगले जि.कोल्हापूर
श्री. सतीश बागल

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, हातकणंगले,
ता.हातकणंगले, जि. कोल्हापूर
श्री. रणजित पांडुरंग देसाई

**मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

आयुक्त, पुणे यांच्या RTS/२२/९० दि. १७.०५.२००२ च्या हुकुमामध्ये खाडाखोड करून मौजे हेर्ले येथे डायरी नं.७००२ केल्याबाबत, तसेच डायरी नं.७००२ मध्ये प्रतिवादी म्हणून श्रीमती श्रीमंतीबाई रामचंद्र पाटील व श्री. प्रकाश पाटील यांची नावे असताना ती बदलली आहेत, त्याबाबत खुलासा, नावात बदल कोणत्या कायद्यान्वये केला त्याबाबत माहिती, तसेच मौजे हेर्ले येथील डायरी नं.७००२ मध्ये कोणत्या शासकीय कर्मचाऱ्यांचे हितसंबंधामुळे डायरी केली त्या सर्व कर्मचाऱ्यांची नावे, पदनाम व इतर अनुषंगिक माहिती

# विवेचन

मौजे हेर्ले, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर येथील डायरी नं. ७००२ मध्ये खाडाखोड केल्याच्या संदर्भात आठ मुद्दयांचा खुलासा मागणारा अर्ज अपीलकर्ता श्री. प्रफुल भालचंद्र चमकले यांनी जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, हातकणंगले यांच्याकडे केला होता. जन माहिती अधिकाऱ्यांनी विहित मुदतीपेक्षा ५ दिवस विलंबाने आपल्याला माहिती दिली, तसेच ती अपुरी व दिशाभूल करणारी आहे, म्हणून आपण केलेले अपील अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, हातकणंगले यांनी फेटाळले. वकिलांचा सल्ला घ्यावा व योग्य त्या न्यायालयात दाद मागावी, अशा स्वरूपाचा सल्ला देण्याचा जन माहिती अधिकाऱ्यांना अधिकार नाही, तरी त्यांनी तो दिला आहे, असे नमूद करून श्री. चमकले यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

आयोगाने दि. १३.५.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. उभय बाजूंमध्ये एकमत न झाल्याने दि.९.७.२००८ रोजी अपिलाची सुनावणी घेण्यात आली.

अपीलकर्त्याला विहित मुदतीत संपूर्ण माहिती देण्यात आली होती, परंतु दोन दिवस सुट्टी व एका दिवशी अपीलकर्त्याचे घर बंद असल्यामुळे माहिती देण्यास प्रत्यक्ष दोन दिवस विलंब झाला. अपीलकर्त्याचा दि. १०.४.२००७ चा अर्ज दि. १७.४.२००७ रोजी प्राप्त झाला. दि. ११.५.२००७ रोजी गाव कामगार तलाठी, हेर्ले यांच्यामार्फत माहिती पाठविण्यात आली. अजूनही काही माहिती हवी असल्यास देण्याची तयारी आहे, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात नमूद केले आहे. मात्र आपल्याला अद्यापही माहिती मिळाली नसल्यामुळे जन माहिती अधिकाऱ्यांना शास्ती व्हावी, असे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले आहे.

उभय बाजूंनी प्रपत्रामधील नोंदीचा पुनरूच्चार आयोगापुढील सुनावणीत केला. तत्कालीन अपिलीय प्राधिकाऱ्यांनी जन माहिती अधिकाऱ्यांची कार्यवाही योग्य ठरविली व मूळ प्रकरणातील दि. २५.१०.२००४ च्या प्रलंबित अर्जावर तात्काळ कार्यवाही करण्याचे आदेशही हक्क नोंद संकलन व निवासी नायब तहसीलदार यांना दिले. त्यानुसार कार्यवाही झालेली आहे. विभागीय आयुक्त, पुणे यांच्यापुढील प्रकरणात प्रतिवादीच्या नावात टंकलेखनात चूक झाली होती, त्याची संपूर्ण माहिती अपीलकर्त्यास दिली आहे, असे

जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार श्री. रणजित पांडुरंग देसाई व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, हातकणंगले श्री. सतिश बागल यांनी नमूद केले.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे पाहता श्री. चमकले यांच्या अर्जातील सर्व मुद्दे हे - 'असे करता येते का,' 'कोणत्या शासकीय कर्मचाऱ्यांच्या हितसंबंधामुळे डायरी केली', 'फौजदारी कायद्याचा भंग केला, असे माझे ठाम मत आहे, आपले मत कळवावे', अशा स्वरूपाचे आहेत. 'प्रतिवादी, तलाठी हेर्ले, मंडल अधिकारी, हेर्ले व तहसीलदार, हातकणंगले या सर्वांनी कटकारस्थान करून वरील डायरी घातल्याचे दिसून येत आहे, याबाबत लेखी खुलासा करावा,' अशा स्वरूपाची विचारणा केली आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार ही 'माहिती' ठरत नाही. मत, खुलासा, भाष्य यांची मागणी या अधिनियमाअंतर्गत करता येत नाही. तरीही जन माहिती अधिकाऱ्यांनी सर्व मुद्दयांची उत्तरे दिलेली आहेत, मात्र 'वकिलांचा सल्ला घ्या', किंवा 'न्यायालयात जा', असा सल्ला त्यांनी संदर्भानुसार दिला असला तरी न देणे अधिक उचित ठरले असते.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. १० .८.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.रामदास सदाशिव चव्हाण
पिंपळे निलख, गणेशनगर, रांका बिल्डिंग,
फ्लॅट नं.४ व ८, राणकपूरनगरी, सांगवी, पुणे-२७ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त,
कर आकारणी व करसंकलन प्रमुख,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासन अधिकारी (कर),
निगडी प्राधिकरण विभागीय कार्यालय,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७८८ / पुणे / २००८ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२६.८.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.रामदास सदाशिव चव्हाण
पिंपळे निलख, गणेशनगर, रांका बिल्डिंग,
फ्लॅट नं.४ व ८, राणकपूरनगरी, सांगवी, पुणे-२७

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त, कर आकारणी व करसंकलन प्रमुख,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे श्री.साहेबराव गायकवाड
श्री.सुधाकर देशमुख

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासन अधिकारी (कर), निगडी प्राधिकरण विभागीय कार्यालय,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे श्री.सोपानराव लांडगे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ६.१२.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २६.१२.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १.१.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १.२.२००८ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>मिळकत क्र.५/७/९३० व क्र.५/८/९३१, पिंपळे निलख-हस्तांतरणाबाबत. सन २००२-०३ ते २००६-०७ या वर्षातील माहिती. मालमत्ता हस्तांतर नोंदवहीतील प्रत, हस्तांतरासाठी केलेल्या अर्जाच्या प्रती, संबंधितांच्या नावाने कर भरल्याच्या पावत्या, जाहीर नोटीस, याबाबतची मंजूर टिपणी, हस्तांतर आदेशाची प्रत. | |

## विवेचन

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सांगवी विभागीय कार्यालयाच्या क्षेत्रातील मिळकतीच्या हस्तांतरणाबाबतची माहिती अपीलकर्ता श्री.रामदास सदाशिव चव्हाण यांना मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी चुकीची माहिती दिल्याच्या कारणावरुन श्री.चव्हाण यांनी अपिलीय प्राधिकारी तथा करआकारणी व करसंकलन प्रमुख, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका यांच्याकडे अपील केले. 'अपीलकर्त्याच्या मूळ अर्जावर मिळकत कराच्या पावत्या संगणकीकृत दिल्या होत्या. त्यामुळे सॉफ्टवेरमधील त्रुटीमुळे प्रिंट काढताना जुन्या पावत्यात चालू नाव आले होते. मात्र अपिलावरील सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांना हव्या असलेल्या पावत्यांच्या मूळ प्रतीवरुनच्या झेरॉक्स प्रती प्रतिवादी यांना दिल्या आहेत. अपिलार्थी यांचे अपीलअर्जातील मिळकत हस्तांतरणासंबंधीचे हरकतीचा मुद्दा हा माहिती अधिकार कक्षेत येत नाही. याबाबत अपिलार्थी यांनी स्वतंत्रपणे योग्य त्या सक्षम अधिकाऱ्यांकडे अर्ज करणे आवश्यक आहे,' या निष्कर्षासह अपिलीय प्राधिकाऱ्यांनी अपील निकाली काढले. या निर्णयाने समाधान न झाल्याने, श्री.चव्हाण यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे. आपला फ्लॅट कर्मचाऱ्यांच्या संगनमताने बळकावण्याचा प्रयत्न दिसून येत असून सर्व कागदपत्रे बनावट करण्यात आलेली आहेत. त्याची तपासणी होऊन

फ्लॅटची नोंद व सन २००८-२००९ ची मालमत्ता कर आकारणी आपल्या नावे करुन मिळावी, अशी मागणी श्री.चव्हाण यांनी या अपिलात केली आहे.

श्री.चव्हाण यांनी मागितलेली सर्व माहिती देण्यात आली आहे. मात्र मालकीची कागदपत्रे सादर न करता मिळकतीला आपले नाव लावावे, अशी त्यांची मागणी आहे. मालकी हक्कासंदर्भात त्यांच्याकडे वेळोवेळी कागदपत्रांची मागणी करुनही त्यांनी ती सादर केलेली नाही, म्हणून त्यांचे नाव मिळकतीला दाखल करता आलेले नाही, असे जन माहिती अधिकारी श्री.सोपानराव महादेव लांडगे यांनी लेखी व तोंडी नमूद केले.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे पाहता श्री.चव्हाण यांची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या अंतर्गत येत नाही. मागितलेली माहिती त्यांना देण्यात आलेली आहे. परंतु मिळकतीला नाव लावणे किंवा त्याबाबतच्या प्रशासकीय कार्यवाहीत नियमाचे पालन न झाल्याच्या तक्रारीची दखल घेणे हा माहितीच्या अधिकारातील विषय नाही. आवश्यक तर त्यासाठी अपीलकर्त्याने स्वतंत्र न्यायासनाकडून दाद मागणे योग्य होईल.

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२७.८.२००९.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.निशीकांत बंडोपंत पाटील
हत्तीमहाल, राधानगरी घ.नं.८०६(ग.नं.६५३), पो.फेजीवडे,
ता.राधानगरी, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

(१)**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती राधानगरी, जि.कोल्हापूर — उत्तरवादी
(२)**अपिलीय प्राधिकारी** तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी,
ग्रामपंचायत, जि.कोल्हापूर

(१)**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत राधानगरी, जि.कोल्हापूर
(२)**जन माहिती अधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती राधानगरी, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८०+१८१ / कोल्हापूर /२००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१०.७.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.निशीकांत बंडोपंत पाटील
हत्तीमहाल, राधानगरी घ.नं.८०६(ग.नं.६५३), पो.फेजीवडे,
ता.राधानगरी, जि.कोल्हापूर

(१)**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती राधानगरी, जि.कोल्हापूर श्री.आर.के.जोशी

| | | |
|---|---|---|
| (२)**अपिलीय प्राधिकारी** तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी,<br>ग्रामपंचायत, जि.कोल्हापूर श्री.ए.व्ही.चौगुले<br><br>(१)**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी,<br>ग्रामपंचायत राधानगरी, जि.कोल्हापूर श्री.एम.आर.गुरव | | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१५.२.२००७ (अ.क्र.१८०)<br>दि.२६.१२.२००६ (अ.क्र.१८१) |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १५.३.२००७ (अ.क्र.१८०)<br>दि.१७.११.२००७ (अ.क्र.१८१) |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ४.४.२००७ (अ.क्र.१८०)<br>दि. २२.२.२००७ (अ.क्र.१८१) |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १६.४.२००७ (अ.क्र.१८०)<br>दि. २१.३.२००७ (अ.क्र.१८१) |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>**अपील क्रमांक / १८०+१८१**<br>राधानगरी ग्रामपंचायतीकडे सन १९९३ साली नोंद असलेली घर मिळकत नं.६७९ चा सन १९८७ ते आजअखेर चालू असेसमेंट उतारा, घरफाळा आकारणी ज्या नियमाचे आधारे केली जाते असे नियम, घरफाळा निश्चित करणारे होऊन गेलेले अधिकारी व त्यांचा कालावधी, घरफाळा भरणाऱ्या व्यक्तीचे नाव. | |

## विवेचन

राधानगरी ग्रामपंचायतीकडे सन १९९३ साली नोंद असलेल्या मिळकतीच्या सन १९८७ पासून २००७ पर्यंतच्या घरफाळा आकारणीच्या संदर्भातील माहिती अपीलकर्ता श्री.निशीकांत बंडोपंत पाटील यांनी जन माहिती अधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, राधानगरी, जि. कोल्हापूर (दि.२६.१२.२००६) व जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, राधानगरी ग्रामपंचायत, ता.राधानगरी, जि.कोल्हापूर (दि.१५.२.२००७) यांच्याकडे मागितली होती. दि.२६.१२.२००६ च्या अर्जानुसार मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी

तथा गटविकास अधिकारी यांनी दिली नाही, या कारणावरुन श्री.पाटील यांनी दि.२९.५.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे(अ.क्र.१८०). तसेच जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी माहिती मुदतीनंतर अपुरी दिली, फसवणूक व दिशाभूल केली, अशा कारणावरुन(अ.क्र.१८१) दि.२९.५.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

दि.१३.५.२००८ रोजी आयोगाने आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. आपल्याला अद्याप पूर्ण माहिती मिळालेली नाही. प्रथम अपील केल्यानंतर जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी यांनी आपल्याला माहिती दिली व त्यांनी दिलेली माहिती हीच आपण दिलेली माहिती असल्याचे भासवून अन्य अपिलात जन माहिती अधिकारी असलेले व ग्रामविकास अधिकाऱ्यांच्या अपिलात अपिलीय प्राधिकारी असलेले गटविकास अधिकारी दिशाभूल करीत आहेत, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.निशीकांत बंडोपंत पाटील यांनी केले. दि.२६.१२.२००६ रोजी आपण माहिती मागितली होती, परंतु ती मिळाली नाही म्हणून आपण दि.१५.२.२००७ रोजी दुसरा अर्ज केला. मात्र दोन्ही अर्जात मागितलेली माहिती वेगवेगळी आहे असे श्री.पाटील यांनी लेखी व तोंडी नमूद केले.

श्री.पाटील यांचा दि.२६.१२.२००६ चा अर्ज आपल्याकडे आला नव्हता, परंतु ग्रामविकास अधिकाऱ्यांनी पूर्ण कागदपत्रे दिली नसल्याच्या कारणावरुन त्यांनी केलेल्या अपिलाची दखल आपण घेतली. त्यानुसार आपल्या कार्यालयाकडून दि.१३.४.२००७ रोजी सुनावणीच्या वेळी श्री.पाटील यांना समक्ष माहिती देण्यात आली, असे प्रतिपादन गटविकास अधिकारी श्री.आर.के.जोशी यांनी लेखी व तोंडी आयोगासमोर केले.

आपल्याला ग्रामविकास अधिकाऱ्यांनी दि.१५.३.२००७ रोजी काही माहिती दिली व प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी दि.१३.४.२००७ रोजी काही माहिती दिली. गटविकास अधिकाऱ्यांकडे जन माहिती अधिकारी म्हणून केलेल्या अर्जावर ही माहिती आपणच दिली असल्याचे गटविकास अधिकारी भासवत आहेत. त्यांच्याकडे आपण दिलेल्या अर्जानुसार माहिती न मिळाल्यामुळे अपिलीय प्राधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत), जिल्हा

परिषद, कोल्हापूर यांच्याकडे आपण केलेल्या अपिलाची सुनावणी दि.१६.३.२००७ रोजी झाली व सात दिवसांत माहिती देण्याचा आदेश अपिलीय प्राधिकाऱ्यांनी गटविकास अधिकारी यांना दिला. परंतु (अन्य अपिलानुसार) माहिती देण्यात आली असल्याचे नमूद करुन गटविकास अधिकाऱ्यांनी आपला अर्ज निकाली काढला व दि.२०.४.२००७ च्या पत्रान्वये (प्राप्त दि.२४.४.२००७) ऊर्वरित माहिती आपल्याला पाठविली. त्यानंतर राहिलेली माहिती मागण्यासाठी आपण दि.२५.४.२००७ रोजी पुन्हा अर्ज केला, त्यावर सुनावणीस हजर राहण्याचे आपल्याला कळविण्यात आले व दि.१३.७.२००७ रोजी काही माहिती आपल्याला दिली. त्याविरुध्द दि.२९.५.२००७ रोजी आपण अपील केले. आपल्याला पूर्ण माहिती मिळालेली नसून संगनमताने जाणूनबुजून व दिशाभूल करण्याच्या हेतूने आपला तक्रार अर्ज दि.२८.३.२००७ चा (पोहोच दि.५.४.२००७) तक्रार अर्ज दि.२०.४.२००७ रोजी गटविकास अधिकाऱ्यांनी निकाली काढला, असे श्री.पाटील यांनी लेखी व तोंडी नमूद केले.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे व तोंडी निवेदने पाहता घरमालकीविषयक व्यक्तिगत वादातून दाखल असलेल्या न्यायालयीन प्रकरणासाठी श्री.पाटील विविध पातळ्यांवर अर्ज करीत आले आहेत, असे दिसते. माहितीच्या अधिकारातील दोन अर्जांमध्ये मागितलेली माहिती वेगवेगळी असल्याचे त्यांचे प्रतिपादन योग्य नाही. दोन्हीही अर्जांमध्ये त्यांनी एकच माहिती मागितली आहे. माहिती-मागणीचे अर्ज, प्रथम अपील व तक्रारीअर्ज याबद्दलची एकत्रित तक्रार ते करीत आहेत. तशाच स्वरुपाची एकत्रित विचार करणारी कार्यवाही गटविकास अधिकाऱ्यांनी केली आहे. 'घर मिळकतीच्या नोंदी व घरफाळा आकारणीचे खोटे रेकॉर्ड तयार करुन ग्रामपंचायत व अर्जदार यांना फसवले आहे, हे शाबीत होण्यासाठी माहिती-हवी' असल्याचे श्री.पाटील यांनी वेळोवेळी दाखल केलेल्या विस्तृत निवेदनांमध्ये म्हटले आहे. संबंधित माहिती श्री.पाटील यांना देण्यात आली असल्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी सादर केलेल्या प्रतीवरुन दिसते. एका अर्जातील जनमाहिती अधिकाऱ्यांनी दिलेली माहिती दुसऱ्या अर्जातील अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिल्याचे मानता येणार नाही, असा श्री.पाटील यांचा युक्तिवाद आहे. मात्र

दोन अर्जांमधील मागणी, माहितीचा वीस वर्षांचा कालावधी, विस्तृत पत्रव्यवहार, अर्ज व अपिले यांचा कालावधी आणि सरमिसळ यांचा विचार करता या तक्रारीची दखल घेता येणार नाही. 'ग्रामपंचायत मिळकतीबाबत काही काळानंतर फेर सर्व्हेक्षण करुन मालक-भोगवटेदार, प्रतं, क्षेत्र करआकारणी यांच्या फेर दुरुस्त नोंदी केल्या जातात. मात्र या मिळकतीबाबत तसे कधीच केलेले नाही. खोटी कागदपत्रे करुन खोट्या नोंदी व खोटी करआकारणी या मिळकतीबाबत केलेली आहे व ती उघड होऊ नये म्हणून अपीलकाराने मागितलेली माहिती देण्याचे टाळले जात आहे आणि म्हणूनच कायद्यातील तरतुदीप्रमाणे यातील संबंधित व्यक्तींवर कारवाई व्हावी,' अशी श्री.पाटील यांची मागणी आहे. माहिती दिलेली आहे, असे दिसते, अन्य आक्षेपांचा विचार माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**पुणे**
**दि.२०.८.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.दत्ता नारायण राणे
लालनगर, घर नं.१२७६/३८८, इचलकरंजी,
ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विभागीय नियंत्रक,
राज्य परिवहन महामंडळ, कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा विभागीय अभियंता (स्थापत्य),
राज्य परिवहन महामंडळ, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८२+१८३ / कोल्हापूर /२००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१०.७.२००८ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विभागीय नियंत्रक,
राज्य परिवहन महामंडळ, कोल्हापूर श्री.जी.एच.पालेकर

**जन माहिती अधिकारी** तथा विभागीय अभियंता (स्थापत्य),
राज्य परिवहन महामंडळ, कोल्हापूर श्री.एस.जी.वारके

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ५.४.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २३.४.२००७, ३.५.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २२.५.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २९.५.२००७, ७.११.२००७ |

| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** |
|---|---|
| | कोल्हापूर जिल्हा मजूर संस्थेने टेंडरमधून मिळविलेली कामे व वाटप समितीकडून घेतलेली कामे व नोंदणीकृत ठेकेदार व त्यांनी घेतलेली कामे (कालावधी सन२००५ ते २००७ मार्चअखेर).<br>दि.११.९.२००६ ते २१.२.२००७ अखेर प्राथमिक मजूर सहकारी संस्थेकडील चेकची माहिती. |

## विवेचन

कोल्हापूर जिल्हा मजूर संस्था व प्राथमिक मजूर सहकारी संस्था यांना मिळालेले धनादेश याबाबतची माहिती अपीलकर्ता श्री.दत्ता नारायण राणे यांनी जन माहिती अधिकारी तथा विभागीय अभियंता (स्थापत्य), राज्य परिवहन महामंडळ, कोल्हापूर विभाग यांच्याकडे मागितली होती. माहिती मिळाली, परंतु जन माहिती अधिकाऱ्यानी १० रुपये भरुन घेऊन त्याची पावती दिली नाही (अपील क्र.१८२), व माहिती प्रत्यक्ष नेणार असल्याचे नमूद केलेले असताना टपालखर्चासह घेतलेले ३८५ रुपये शुल्क (अपील क्र.१८३), या कारणावरुन श्री.राणे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा विभाग नियंत्रक, राज्य परिवहन महामंडळ, कोल्हापूर विभाग यांच्याकडे अपिले केली. महिती विहित मुदतीत दिली असून जन माहिती अधिकाऱ्यांनी १०रु. घेतल्याचे म्हणणे निराधार आहे व ३८५रु. शुल्क आकारण्यात एक रुपया जास्त आकारला गेला आहे, तो परत द्यावा, असा आदेश अपिलीय प्राधिकारी तथा विभाग नियंत्रक, राज्य परिवहन महामंडळ, कोल्हापूर विभाग यांनी देऊन अपिले नाकारली आहेत. त्याविरुध्द श्री.राणे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपिले केली आहेत.

दि.१३.५.२००८ रोजी आयोगाने आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलांचा समावेश होता. माहिती परिपूर्ण व वेळेत दिली असून विहित मुदतीत अपिलांची निर्गती केली आहे, असे जन माहिती अधिकारी श्री.एस.डी.वारके व अपिलीय प्राधिकारी श्री.जी.एम.पालेकर यांनी प्रपत्रात नमूद केले, तर हे म्हणणे अमान्य असून सुनावणी घ्यावी, अशी मागणी श्री.राणे यांचे प्रतिनिधी श्री.बसवराज रविंद्र मलाबादे यांनी नोंदविली. उभय घटकांत एकमत न झाल्याने अपील सुनावणीसाठी घेण्यात आले.

अपीलकर्ता अथवा त्यांचे प्रतिनिधी सुनावणीला उपस्थित नव्हते. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी हे एकाच खात्यातील असल्यामुळे जन माहिती अधिकाऱ्यांनी आपली आर्थिक, शारिरीक व मानसिक पिळवणूक केलेली आहे, त्यामुळे त्यांची खातेनिहाय चौकशी करुन त्यांना निलंबित करण्यात यावे, असे श्री.राणे यांनी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'च्या वेळी आयोगाला सादर केलेल्या लेखी निवेदनात म्हटले आहे.

जन माहिती अधिकारी श्री.वारके यांनी १०रु. घेऊन पावती दिली नाही व भ्रष्टाचार केला ही कपोलकल्पित कथा आहे. वैयक्तिक आकसापोटी श्री.राणे अशा प्रकारचे आरोप करीत आहेत. तसेच जन माहिती अधिकाऱ्यांच्या उत्तरात अथवा अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या निकालपत्रात उल्लेख नसलेल्या बाबी त्यांच्या निकालपत्राचा भाग म्हणून नमूद करीत आहेत, असे अपिलीय प्राधिकारी श्री.पालेकर यांनी उदाहरणांसह लेखी व तोंडी नमूद केले. विवाहितेवर बलात्कार केल्याचा गुन्हा अपीलकर्ता श्री.राणे यांच्याविरुध्द पोलिसांनी दाखल केला असल्याचे, तसेच खंडणी व फसवणुकीचाही गुन्हा नोंद झाल्याचे वर्तमानपत्रांमध्ये प्रसिध्द झाले आहे, असे वर्तमानपत्रांच्या संबंधित कात्रणांसह जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी सादर केले.

उभय बाजूंची लेखी व तोंडी निवेदने लक्षात घेता श्री.राणे यांना माहिती विहित मुदतीत जन माहिती अधिकाऱ्यांनी दिली आहे. श्री.राणे यांनी केलेल्या आरोपांबाबतचा कोणताही ठोस पुरावा सादर केलेला नाही, त्यामुळे अशा आरोपांची दखल घेण्याची गरज नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## <u>आदेश</u>

अपील अमान्य.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १४.८.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. अनिल दिनकर जाधव (अंबिलढोक)
रा. ताराराणी कॉलनी, २५५/५३ बी वॉर्ड
संभाजी नगर, कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा
पोलीस अधीक्षक, कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा
उपविभागीय पोलीस अधिकारी, शाहूवाडी विभाग,
जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८४+१५९+१८९ / कोल्हापूर /२००७ |
| २ | सुनावणीची तारीख | ९.७.२००८ |

३. **उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. अनिल दिनकर जाधव
रा. ताराराणी कॉलनी, २५५/५३ बी वॉर्ड
संभाजी नगर, कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा पोलीस अधीक्षक, कोल्हापूर
श्री. सी. जी. कुंभार

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, शाहूवाडी विभाग,
जि.कोल्हापूर श्री. तुषार पाटील

**मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

मौजे कोतोली पैकी मानेवाडी येथील गट नं.१२९, १३० व १३७ या क्षेत्राच्या तक्रारीबद्दल पोलीस अधीक्षक, कोल्हापूर यांच्याकडे दि. ११.६.२००६, दि. २१.१२.२००६ व दि. १८.१.२००७ रोजी दिलेल्या निवेदनवजातक्रार अर्जाची चौकशी अहवालाची छायांकित प्रत व सदर केसच्या संदर्भात सविस्तर माहिती

## विवेचन

आपल्या क्षेत्रातील गवत कापून नेल्याबद्दल पन्हाळा पोलीस ठाण्याकडे केलेल्या तक्रारींची दखल न घेतल्याने वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे आपण केलेल्या तक्रारीबाबतच्या चौकशी अहवालाची प्रत व अन्य माहिती देण्यास जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, शाहूवाडी विभाग, कोल्हापूर व अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस अधीक्षक, कोल्हापूर यांनी जाणूनबुजून टाळाटाळ केली, अशा कारणावरून अपीलकर्ता श्री. अनिल दिनकर जाधव यांनी राज्य माहिती आयोगाकडे तीन अपिले केली आहेत. या तीनही अपिलातील मागणी सारखीच आहे.

आपल्या जमिनीच्या इतर हक्कातील कुळाची नोंद व त्या संदर्भात उच्च न्यायालयात चालू असलेले दावे या अनुषंगाने श्री. जाधव विविध पातळ्यांवर अर्ज करीत आले आहेत. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, कोल्हापूर यांनी हेतुपुरस्सर माहिती देण्यास टाळाटाळ केली. अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस अधीक्षक, कोल्हापूर यांनी अपिलाची दखल घेतली नाही. या सर्व प्रकरणात पोलीस आपल्याला माहिती देत नाहीत व आपल्या विरूध्द पक्षाला मदत करीत आहेत, असे श्री. जाधव यांनी अपिलात नमूद केले आहे.

आयोगाने दि. १३.५.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलांचा समावेश होता. उभय बाजूंमध्ये एकमत न झाल्याने दि. ९.७.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली.

आपण दि. ११.९.२००६ रोजी पन्हाळा पोलीस ठाण्यात तक्रार नोंदविली होती. २२४ दिवसांनी (दि.१०.११.२००७ रोजी ) आपल्याला माहिती मिळाली, जाणूनबुजून हा विलंब अधिकाऱ्यांनी केला, त्याबद्दल त्यांच्यावर शास्तीसह कारवाई करावी, अशी मागणी श्री. जाधव यांनी केली. मुंबई उच्च न्यायालयातील अवमान याचिकेच्या कामी आपल्याला ही माहिती हवी होती, त्याची मुदत दि. २१.६.२००७ पर्यंत होती. या मुदतीत आपल्याला माहिती मिळाली नाही, त्यामुळे न्यायालयाने आपली याचिका निकाली काढली, असे श्री. जाधव यांनी आयोगापुढील सुनावणीत सांगितले. श्री. जाधव यांना माहितीबाबत कार्यवाही करून शुल्क भरण्याबाबत कळविण्यात आले होते, परंतु त्यांनी शुल्क भरले नाही, त्यामुळे त्यांना त्वरित माहिती मिळाली नाही. त्यानंतर आयोगाने विचारणा केल्यानंतर श्री. जाधव यांना नि:शुल्क माहिती पुरविण्यात आली, असे तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. प्रभाकर पाटील व अपिलीय प्राधिकारी यांचे

प्रतिनिधी, विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. तुषार पाटील यांनी नमूद केले. संबंधित पत्र आपल्याला मिळाले नाही, त्यामुळे आपण शुल्क भरण्याचा प्रश्न आला नाही, असे प्रतिपादन श्री. जाधव यांनी केले.

श्री. जाधव यांचा दि. १.३.२००७ रोजीचा माहिती मागणीचा अर्ज दि. ८.३.२००७ रोजी प्राप्त झाला. अहवालाची छायांकित प्रत मिळण्यासाठी दि. १३.३.२००७ अन्वये पोलीस अधीक्षक, कोल्हापूर यांच्याकडे व दि. १६.४.२००७ रोजी बिनतारी संदेशाद्वारे पन्हाळा पोलीस ठाण्याकडे मागणी करण्यात आली. संबंधित माहिती दि. १७.४.२००७ रोजी प्राप्त झाली व दि. १८.४.२००७ रोजी शुल्क भरून माहिती घेण्याबाबत श्री. जाधव यांना कळविले, त्यावर त्यांच्याकडून प्रतिसाद मिळाला नाही. अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस अधीक्षक यांच्याकडे दि. १२.४.२००७ अन्वये त्यांनी अपील केले व दि. २.११.२००७ रोजी त्यांना माहिती पाठविण्यात आली. उच्च न्यायालयात आपल्या याचिकेची मुदत दि. २१.६.२००७ रोजी संपली असल्याने आपल्याला माहितीचा काही उपयोग नाही, असे श्री. जाधव यांनी दि. ७.११.२००७ अन्वये आपल्या कार्यालयाला कळविले, असे तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस अधीक्षक, कोल्हापूर डॉ. सुखविंदर सिंह यांनी आयोगाला सादर केलेल्या लेखी निवेदनात नमूद केले आहे. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, शाहूवाडी विभाग, कोल्हापूर (सध्या सहायक पोलीस आयुक्त, पिंपरी विभाग, पुणे ) श्री. प्रभाकर पाटील यांनी अशाच आशयाचे निवेदन संबंधित पत्रव्यवहाराच्या प्रतींसह केले.

संबंधित अधिकाऱ्यांनी तांत्रिक बाबींची पूर्तता केल्याचे कागदपत्रांवरून दिसत असले तरी प्रथम अपिलाचा निर्णय अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस अधीक्षक, कोल्हापूर डॉ. सुखविंदर सिंह यांनी जास्तीत जास्त ४५ दिवसांच्या विहित मुदतीत देणे आवश्यक होते. तो त्यांनी दिलेला नाही, त्यामुळे याबाबत त्यांना समज देण्यात येत आहे.

आपल्याला पत्र मिळाले नसल्याचे अपीलकर्त्याचे म्हणणे आहे. परंतु यु.पी.सी.ने पत्र पाठविले होते, असे निवेदन विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. तुषार पाटील यांनी केले. त्याच्या जावक नोंदीची छायांकित प्रत सादर करण्याचा मौखिक आदेश आयोगाने दिला, त्यानुसार श्री. तुषार पाटील यांनी जावक नोंद वहीतील प्रत सादर केली. व दि. १९.७.२००८ रोजी आयोगाला सादर केली. त्यात 'नोंद क्रं.६५४ श्री. अनिल दिनकर जाधव, दि. १.३.२००७ रोजीच्या मागणी अर्जाप्रमाणे नक्कल घेऊन जाण्याबाबत' असा

उल्लेख आहे. तो पाहता पत्र न मिळाल्याची अपीलकर्त्याची तक्रार रास्त नाही. मात्र माहिती देण्याबाबत पोलीस प्रशासनाने अधिक तत्परता दाखविणे आवश्यक होते. या पुढील काळात या बाबींची दक्षता घेण्याची समज जिल्हा पोलीस अधीक्षक, कोल्हापूर यांच्यामार्फत पोलीस प्रशासनास देण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपिले अमान्य करण्यात येत आहेत.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ११ .८.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.देवदास मारुती बोलके
माद्याळ(देवर्डे पैकी), पो.गवसे, ता.आजरा, जि.कोल्हापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती आजरा, जि.कोल्हापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत देवर्डे, ता.आजरा, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९१+१९९+२००+२०१+२०२/कोल्हापूर/२००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१०.७.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.देवदास मारुती बोलके
माद्याळ(देवर्डे पैकी), पो.गवसे, ता.आजरा, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती आजरा, जि.कोल्हापूर श्री.जे.अे.मोरे

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत देवर्डे, ता.आजरा, जि.कोल्हापूर श्री.एम.बी.दोरुगडे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १५.१.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २८.३.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १५.६.२००७ |

| | | |
|---|---|---|
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>(१)देवर्डे ग्रामपंचायतीच्या ताब्यातील गायरानातील ऑस्ट्रेलियन बाभूळ जातीचे झाडांचे विरळीकरणाबाबत शासनाकडून मिळालेल्या परवानगीची प्रत, विरळीकरणाकरिता केलेल्या पंचनाम्याची प्रत, ठेका देण्याकरिता निविदा मागविल्या किंवा कसे, जाहीर नोटीस दिली होती किंवा कसे, ठेका घेण्याकरिता आलेल्या निविदांची, किती रकमेस व कोणाला ठेका दिला याची माहिती, पंचनामा करुन तोड करण्यासाठी किती झाडांची परवानगी दिली व जागेवर शिल्लक झाडांची संख्या<br>(२)जानेवारी २००१ ते २००७ पर्यंत ग्रामपंचायतीकडून इंदिरा विकास आवास योजनेंतर्गत मंजूर केलेल्या घरांची नाववार यादी, २००६ चे फेब्रुवारीमध्ये झालेल्या रवळनाथ देवाचे यात्रेकरिता ग्रामपंचायतीमार्फत केलेल्या खर्चाचे विवरण.<br>(३)जानेवारी २००५ ते २००७ पर्यंत घरठाणपत्रकाच्या नवीन नोंदी केल्या मिळकतीचे तारीख, वार, यादी व संबंधित मालकाचे नाव, देवर्डे व माद्याळ गावामध्ये शौचालय बांधकाम दुरुस्तीसाठी दिलेल्या अनुदानाची नाववार यादी व प्रत्येकी रक्कम व मंजूर ठिकाणचे बांधकाम पूर्ण झाले किंवा कसे.<br>(४)माद्याळ गावठाण मोजणी व बांधकाम परवाने-हद्दीच्या खुणा निश्चित करण्याकामी भरलेल्या मोजणी फी ची रक्कम व जोडलेल्या माहितीची प्रत, चेक नंबर, आजपर्यंत पोल्ट्री व्यवसाय व इतर व्यवसायाकरिता बांधकाम परवाने व ना हरकत दाखले देण्यासाठी केलेला ठराव, नावे व ठिकाणे. |

## विवेचन

पोस्ट देवर्डे, ता.आजरा येथील ग्रामपंचायतीकडील विविध विषयांच्या संदर्भात अपीलकर्ता श्री.देवदास मारुती बोलके यांनी जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रुप ग्रामपंचायत देवर्डे, ता.आजरा, जि.कोल्हापूर यांच्याकडे मागणी केली होती. माहिती न मिळाल्याच्या कारणावरुन त्यांनी केलेली अपिले अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती आजरा, जि.कोल्हापूर यांनी फेटाळली. त्याविरुध्द श्री.बोलके यांनी राज्य माहिती आयोगाकडे पाच अपिले केली आहेत.

दि.१३.५.२००८ रोजी आयोगाने आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलांचा समावेश होता. आपल्याला माहिती मिळाली नाही, असे श्री.बोलके यांनी प्रपत्रात नमूद केले, तर माहिती देऊ केली असतानाही अपीलकर्त्याने माहिती स्वीकारण्यास नकार दिला, असे

जन माहिती अधिकारी श्री.एम.बी.होरुगडे व अपिलीय प्राधिकारी श्री.बी.एस.कोपार्डेकर यांनी नमूद केले. उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलांची सुनावणी घेण्यात आली.

'श्री.बोलके यांनी ग्रामपंचायतीच्या गावठाण हद्दीतील ग्रामपंचायतीच्या मालकीच्या जागेवर अतिक्रमण करुन घर बांधल्याने त्यांची व ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांची एकमेकात नाराजी दिसून येते. अतिक्रमण करुन बांधलेल्या घराची नोंद घरठाण पत्रकी होण्यास ग्रामपंचायत तयार नसून अतिक्रमणातील घर विनापरवाना बांधकाम केलेले आहे, याबाबत आजरा कोर्टात केस सुरु आहे. त्यामुळे ग्रामपंचायत/पंचायत समिती कार्यालय यांच्याबाबत नाराजी आहे. श्री.बोलके यांना कोणत्याही माहितीची आवश्यकता नसून प्रशासनास वेठीस धरण्याचे धोरण दिसून येते. श्री.बोलके यांनी आतापर्यंत पंचायत समितीकडे एकूण २३ विविध विषयांची माहिती मागणी केलेली आहे,' असे गटविकास अधिकारी, पंचायत समिती आजरा श्री.जे.अे.मोरे यांनी दि.२०.५.२००८ रोजी आयोगाला सादर केलेल्या लेखी निवेदनात नमूद केले आहे. श्री.बोलके यंनी केलेल्या २३ अर्जांचा पूर्ण तपशील त्यांनी त्यासोबत दिला आहे.

आपल्याला दि.२०.५.२००८ च्या पत्रासोबत माहिती मिळाली असून या अपिलांबद्दल आपली कोणतीही तक्रार नाही, अपिले निकाली काढावीत, असे श्री.बोलके यांनी दि.१०.७.२००८ राजी सुनावणीच्या दिवशी लेखी व तोंडी नमूद केले. त्यांची विनंती मान्य करुन अपिले निकाली काढण्यात येत असल्याचा मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिला.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपिले निकाली काढण्यात येत आहेत..

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.१४.८.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. कुदंनमल सि. खिंवसरा
रा. ४४६/३, प्रतिक्षा, गोखले रोड, पुणे-१६ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अतिरिक्त आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे-१८ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपशहर अभियंता,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे-१८

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९१९ / पुणे / २००८ |
| २ | सुनावणीची तारीख | २६.८.२००८ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. कुदंनमल सि. खिंवसरा
रा. ४४६/३, प्रतिक्षा, गोखले रोड, पुणे-१६

**अपिलीय प्राधिकारी** तथा अतिरिक्त आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे-१८ श्री. सुभाष डुंबरे

**जन माहिती अधिकारी** तथा उपशहर अभियंता,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे-१८ श्री. रामदास तांबे

<u>मूळ अर्जात मागणी केलेली माहिती</u>

१. सर्व्हे क्र.१२६/२, आकुर्डी या मंजूर लेआऊटमधील ओपन स्पेस महानगरपालिकेच्या मालकीचे आहेत का ?
२. महानगरपालिकेच्या मालकीची नसल्यास ती संपादन करण्यासाठी मूळ जमीन मालकास कशा प्रकारे मोबदला दिला.
३. ओपन स्पेसच्या संपादनासाठी प्रस्ताव होता का, भूसंपादनाची अधिसूचना, भूसंपादनाचा निवाडा वगैरे सर्व कायदेशीर बाबींची पूर्तता झाली का, या सर्व गोष्टींची तपशीलवार माहिती, सदरची ओपनस्पेश विकास आराखड्यात उद्यानास आरक्षित केलेली आहे का ?

४. ओपन स्टेस मधून कोपरा कापून काढून सर्व्हे नं.१२७/अ/१ कडे जाणारा रस्ता काढला आहे का
५. विकास आराखड्यात सर्व्हे नं.१२६/२ आकुर्डी मंजूर ले आऊट यामधील रस्त्याचे पुढे जाणरा सरळ रस्ता स.नं.१२७/अ/१ मधून दर्शविला आहे का, त्या नकाशाची प्रत
६. सर्व्हे नं.१२७/अ/१ मध्ये ओळीने अनेक वर्कशॉपची बांधकामे आहेत, त्याचे नकाशे महानगरपालिकेने मंजूर केले आहेत का ?
७. बांधकामात युनायटेड मोटर्स इंडीया प्रा. लि. हे कलेला वर्कशॉप असलेली इमारत आहे, याच जागेतून मंजूर विकास आराखड्यात सर्व्हे नं.१२६/२ मधील रस्ता सर्व्हे नं. १२७/अ/१ मधून पुढे जाणारा दर्शविला आहे, त्याचा नकाशा
८. हा रस्ता महानगरपालिकेने प्रथम ओपन स्पेस कापून व नंतर स.नं.१२६/२ आकुर्डी सब प्लॉट नं.२८ या मंजूर रहिवासी भुखंडातून काढण्यात आला आहे, यास कायदेशीर मान्यता आहे का ?
९. उच्च न्यायालयाचे हुकूमानुसार महानगरपालिकेने ओपन स्पेसमध्ये काही बांधकाम करेल असे गृहीत धरलेले नव्हते, हे बरोबर आहे का याबाबत माहिती

## विवेचन

आपल्या मालकीच्या रहिवासी भूखंडातून खुल्या जागेतून अन्य वर्कशॉपसाठी रस्ता दिला असून त्याबाबतची नुकसान भरपाई मिळालेली नाही, या विषयाबाबत जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी दिलेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपीलकर्ता श्री. कुंदनमल सी. खिंवसरा यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

एकूण नऊ मुद्दयांची माहिती श्री. खिंवसरा यांनी मागितली होती, परंतु त्यापैकी पाच मुद्दयांची माहिती देण्यात आली असून चार मुद्दयांची माहिती सविस्तर दिलेली नव्हती. उच्च न्यायालयातील याचिका प्रकरणी दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रात तो तपशील असण्याची शक्यता तपासावी व संबंधित विभागाकडून सविस्तर माहिती मागवून घेऊन श्री. खिंवसरा यांना द्यावी, असा निर्णय अपिलीय प्राधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे यांनी प्रथम अपिलात दिला. परंतु त्यातील दोन मुद्दयांची माहिती मिळाली व उत्तरे संदिग्ध आहेत, न मागितलेली माहिती दिली आहे. श्री. खिंवसरा यांच्या रहिवासी भूखंडातून रस्ता गेलेला असताना नुकसान भरपाई मिळाली नाही. मंजूर आराखड्यात दाखविलेल्या जागेपेक्षा वेगळ्या ठिकाणी रस्ता केला आहे, असे प्रतिपादन श्री. खिंवसरा यांच्या वकील ॲड. अनघा परळीकर यांनी केले. औद्योगिक बांधकाम परवानगी दाखला व विकास योजनेतील नकाशा श्री. खिंवसरा यांना देण्यात आला असून कोणतीही माहिती लपविलेली नाही, असे जन माहिती अधिकारी श्री. रामदास तांबे व अपिलीय प्राधिकारी श्री. सुभाष डुंबरे यांनी नमूद केले. श्री. खिंवसरा यांची नुकसान भरपाईची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत

येत नाही. मात्र मूळ अर्जाच्या अनुषंगाने प्रत्यक्ष जागेवरील वस्तुस्थितीची संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी श्री. रामदास तांबे यांनी श्री. खिंवसरा यांना आठ दिवसांत द्यावी व त्याबाबतचा पूर्तता अहवाल आयोगाला सादर करावा, असा मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिला.

आयोगाच्या आदेशानुसार दि. २९.८.२००९ रोजी उप संचालक, नगररचना, कार्यकारी अभियंता-स्थापत्य (अ) व जन माहिती अधिकारी तथा उपशहर अभियंता यांनी माहिती तयार करून श्री. खिंवसरा यांना कळविले. त्यानंतर दोन वेळा भ्रमणध्वनीवरून त्यांच्याशी संपर्क साधला, मात्र ते आले नाहीत. त्यानंतर त्यांच्याशी सांगोपांग चर्चा झाली. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या खुल्या जागेला महानगरपालिकेने मोबदला दिल्याबाबतची कागदपत्रे आपण देऊ, त्यानंतर त्यानुसार माहिती द्यावी, असे त्यांनी सांगितले. परंतु अशी कागदपत्रे उपलब्ध न झाल्याचे दि. १६.१०.२००८ रोजी त्यांनी कळविले. त्यामुळे आधीची तयार असलेली माहिती त्यांना टपालाने निःशुल्क पाठविली, असे पत्रव्यवहाराच्या प्रतींसह श्री. रामदास तांबे यांनी आयोगास अवगत केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ३१ .८.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.दत्तकुमार यशवंत जाधव
प्लॉट नं.२५, से.नं.२८, निगडी प्राधिकरण, पुणे-४४ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्य उद्यान अधीक्षक,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उद्यान अधीक्षक,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९२९ / पुणे / २००८ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२६.१२.२००८ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्य उद्यान अधीक्षक,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८ श्री.प्रकाश मोगल गायकवाड

**जन माहिती अधिकारी** तथा उद्यान अधीक्षक;
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८ श्री.सुरेश पुंडलीक साळुंके

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३१.१२.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २८.१.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १३.२.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. तारीख नसलेला आदेश |

| | |
|---|---|
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>वृक्ष प्राधिकरण समिती ठराव क्र.५६, दि.१४.३.२००५ व ठराव क्र.३४, दि.२३.११.२००८ नुसार (ठराव दिनांकापासून ते अर्जाच्या तारखेपर्यंत)केलेल्या कार्यवाहीबाबत. दोन्ही ठरावाच्या विषयपत्र व ठरावाच्या प्रती, कार्यवाहीच्या नोंदीचा तपशील दर्शविणाऱ्या कागदपत्रांच्या प्रती, कार्यवाहीची कार्यपध्दती काय आहे त्याची प्रमाणित प्रत, ठरावाप्रमाणे कार्यवाही पूर्ण झाली नाही तर कोणास जबाबदार धरले जाते, काय कारवाई केली जाते, सन २००५-०६ ते डिसेंबर २००७ अखेर अशी कारवाई झाली असल्याची माहिती, प्लॉट नं.२३ ते २८ अवनी बंगला व त्यासमोरील स्नेहसदन सोसायटी सेक्टर २७ यांच्या गेटसमोरील रेन ट्री व उंबराच्या झाडतोडीबाबत झालेले ठराव व केलेली कार्यवाही, ठराव अंमलबजावणीकामी कोणाची लेखी अथवा तोंडी हरकत किंवा असल्यास त्याचा तपशील, वृक्षतोडीची कार्यवाही कर्मचारी करता किंवा ठेकेदारामार्फत केली जाते व संबंधितास किती व काय दराने मेहनताना दिला जातो याची इत्थंभूत व सविस्तर माहिती. |

## विवेचन

वृक्ष प्राधिकरण समितीने दि.१४.३.२००५ व दि.२३.११.२००७ रोजी केलेल्या ठरावावरील कार्यवाहीबाबतची माहिती अपीलकर्ता श्री.दत्तकुमार यशवंत जाधव यानी जन माहिती अधिकारी तथा उद्यान अधीक्षक, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांच्याकडे मागितली होती. परंतु सत्य लपवून ठेवण्याच्या उद्देशाने आपल्याला अपुरी व दिशाभूल करणारी माहिती दिली असल्याचे मत व्यक्त करुन श्री.जाधव यांनी अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य उद्यान अधीक्षक, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांच्याकडे अपील केले. श्री.जाधव यांनी मूळ अर्जानुसार मागणी केलेली सर्व माहिती देण्यात आली असल्याचे नमूद करुन अपिलीय प्राधिकाऱ्यांनी त्यांचे अपील फेटाळले. त्याविरुध्द श्री.जाधव यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

आपल्याला सर्व माहिती मिळाली असल्याचे धडधडीत खोटे लिहून अपिलीय प्राधिकाऱ्यांनी आपल्याला न्याय नाकारला आहे. जन माहिती अधिकाऱ्यांनी व अपिलीय प्राधिकाऱ्यांनी आपली मानसिक, शारीरिक व आर्थिक छळवणूक केलेली आहे, असे प्रतिपादन करुन श्री.जाधव यांनी त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी अपिलात केली आहे.

श्री.जाधव आयोगापुढील सुनावणीस उपस्थित नव्हते.

श्री.जाधव यांनी यापूर्वी दि.२.१.२००८ रोजी माहिती-मागणीचा अर्ज केला होता. ती त्यांना विहित मुदतीत देण्यात आली. त्यांनी केलेल्या अपिलाच्या सुनावणीतही माहिती देण्यात आली असल्याचे स्पष्ट झाले. याच विषयासाठी श्री.जाधव यांनी दि.७.३.२००८ रोजी पुन्हा माहिती मागणीचा अर्ज केला, ती त्यांना देण्यात आली. प्रथम अपिलाच्या सुनावणीला ते हजर न राहिल्यामुळे रजिस्टर टपालाने त्यांना निर्णय पाठविण्यात आला, परंतु त्यांनी रजिस्टर स्वीकारले नाही, असे जन माहिती अधिकारी श्री.प्रकाश गायकवाड व अपिलीय प्राधिकारी श्री.सुरेश साळुंके यांनी पूरक कागदपत्रांसह लेखी व तोंडी नमूद केले.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता दोन्ही वेळेला श्री.जाधव यांना माहिती देण्यात आली असल्याचे स्पष्ट होते. मात्र श्री.जाधव यांची मुख्य मागणी त्यांच्या घरासमोरील रस्त्यालगतचे झाड काढून टाकण्यासंबंधातील आहे. आपल्या बंगल्यासमोरील रेन ट्री काढून टाकण्यासाठी आपण दि.३.३.२००५ रोजी अर्ज केला होता. महानगरपालिकेने ती मागणी मान्य केली, परंतु श्री.संजय जालिंद्रे यांनी झाड तोडण्याच्या विरुध्द तक्रार केल्यामुळे झाड तोडण्याची कार्यवाही न केल्याचे महानगरपालिकेने आपल्याला कळविले. हे झाड दहा फुटापर्यंत कमी करण्याचा आदेश उद्यान विभागाने दि.२.४.२००५ रोजी काढला होता. त्याप्रमाणे कार्यवाही करण्याचे आदेश द्यावेत, अशी विनंती श्री.जाधव यांनी दि.२६.१२.२००८ रोजी आयोगाला सादर केलेल्या निवेदनात केली आहे.

श्री.जाधव व श्री.जालिंद्रे हे एकमेकांचे शेजारी आहेत. रेन ट्रीचे झाड महानगरपालिकेच्या रस्त्याच्या कडेला असून श्री.जालिंद्रे यांचा प्लॉट झाडाच्या जवळ असून श्री.जाधव यांचा प्लॉट श्री.जालिंद्रे यांच्या पाठीमागे आहे. मुळात झाडाचा त्रास दोघांनाही होत नाही, त्यामुळे झाड तोडण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. परंतु दोघांमधील वैयक्तिक वादामुळे श्री.जाधव यांचा झाड तोडण्याकरिता अट्टाहास आहे. प्रशासनावर दबाव आणण्यासाठी श्री.जाधव माहितीच्या अधिकाराचा गैरवापर करीत आहेत, असे जन माहिती अधिकारी श्री.प्रकाश गायकवाड व

अपिलीय प्राधिकारी श्री.सुरेश साळुंके यांनी आयोगाला सादर केलेल्या लेखी निवेदनात नमूद केले आहे.

श्री.जाधव यांना दोन वेळा माहिती देण्यात आली आहे. पुनः पुन्हा तीच माहिती मागणे हा माहितीच्या अधिकाराचा योग्य वापर नाही, याची समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२७.८.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. महेश बाबुराव जाधव
२४४८, बी वॉर्ड, हॉटेल आहारसमोर,
मंगळवार पेठ, कोल्हापूर-४१६ ०१२ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा — उत्तरवादी
विभागीय सह निबंधक सहकारी संस्था,
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर

**जन माहिती अधिकारी** तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९४ / कोल्हापूर /२००७ |
| २ | सुनावणीची तारीख | १०.७.२००८ |

३. **उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विभागीय सह निबंधक सहकारी संस्था, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांचे तर्फे श्री. अरूण काकडे

**जन माहिती अधिकारी** तथा उप निबंधक सहकारी संस्था, कोल्हापूर श्री. अरूण काकडे

**मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

इथेनॉल प्रकल्प, शेतीमाल सहकारी प्रक्रिया संस्था लि., मार्केट यार्ड, कोल्हापूर या संस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, संचालक आणि व्यवस्थापक यांची नावे व रहिवासाचा पत्ता मिळणेबाबत माहिती

## विवेचन

चेअरमन, इथेनॉल प्रकल्प, शेतीमाल सहकारी प्रक्रिया संस्था मर्यादित, मार्केट यार्ड, कोल्हापूर या संस्थेबाबतची माहिती मागणारे दोन अर्ज अपीलकर्ता यांनी चेअरमन, इथेनॉल प्रकल्प, शेतीमाल सहकारी प्रक्रिया संस्था मर्यादित, मार्केट यार्ड, कोल्हापूर व जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, कोल्हापूर यांच्याकडे केले होते. संबंधित माहिती आपल्या अभिलेखात नसल्यामुळे अर्ज संस्थेकडे वर्ग केल्याचे जन माहिती अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर यांनी श्री. जाधव यांना कळविले. त्याविरूध्दचे श्री. जाधव यांचे अपील अपिलीय प्राधिकारी तथा विभागीय सह निबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर, विभाग कोल्हापूर यांनी फेटाळले, म्हणून श्री. जाधव यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

राज्य माहिती आयोगाने दि. १३.५.२००८ रोजी आयोजित केलेल्या ‘विशेष अपील निर्गत कार्यक्रमा’त या अपिलाचा समावेश होता. उभय बाजूंमध्ये एकमत न झाल्याने दि. १०.७.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली.

संबंधित संस्था ही बहुराज्यीय संस्था असल्याने येथील निबंधकाचे कोणतेही नियंत्रण नाही, तथापि जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांनी माहिती देण्याबाबत संस्थेला अनेकदा कळविले आहे, असे जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर यांचे प्रतिनिधी श्री. अरूण पां. काकडे यांनी ‘विशेष अपील निर्गत कार्यक्रमा’तील प्रपत्रात नमूद केले आहे, तर जिल्हा उपनिबंधकाचे नियंत्रण नाही, हे म्हणणे मान्य नसल्याचे श्री. जाधव यांनी नमूद केले आहे.

संगनमताने आपल्याला माहिती नाकारली जात आहे, आपल्या ठेवी परत करण्याचा महत्त्वाचा विषय यात गुंतला असून इथेनॉल प्रकल्प, शेतीमाल सहकारी प्रक्रिया संस्था मर्यादित, मार्केट यार्ड, कोल्हापूर यांच्याकडे अर्ज स्वीकारला जात नाही. संस्थेचा दैनंदिन कारभार, निवडणूक, लेखा परीक्षण इ. बाबींवर सहकार कायद्याच्या जिल्हा उपनिबंधकांचे नियंत्रण असते, तरीही संस्थेवर कारवाई केली जात नाही, असे श्री. जाधव यांनी आयोगाला सादर केलेल्या लेखी निवेदनात म्हटले आहे. मात्र मल्टीस्टेट को.ऑप. सोसायटीज ॲक्टखाली नोंदणी झालेल्या सहकारी संस्थेवर जिल्हा उपनिबंधकांचे नियंत्रण नसते. त्यामुळे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी संस्थेला वारंवार कळविण्याचे काम केले आहे, असे जन माहिती अधिकारी श्री. अरूण पां.काकडे व

अपिलीय प्राधिकारी डॉ. ए.बी. जोगदंड यांनी अध्यक्ष व व्यवस्थापक, शेतीमाल सहकारी प्रक्रिया संस्था मर्यादित, मार्केट यार्ड, कोल्हापूर यांना पाठविलेल्या पत्रांच्या प्रतींसह नमूद केले. ही बाब लक्षात घेता जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी हे माहिती देण्यास जबाबदार ठरत नाहीत.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. १४.८.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. महेश बाबुराव जाधव
२४४८, बी वॉर्ड, हॉटेल आहारसमोर,
मंगळवार पेठ, कोल्हापूर-४१६ ०१२ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा
विभागीय सह निबंधक सहकारी संस्था,
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९४ / कोल्हापूर /२००७ |
| २ | सुनावणीची तारीख | १०.७.२००८ |

३. **उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विभागीय सह निबंधक सहकारी संस्था, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांचे तर्फे श्री. अरूण काकडे

**जन माहिती अधिकारी** तथा उप निबंधक सहकारी संस्था, कोल्हापूर
श्री. अरूण काकडे

**मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

इथेनॉल प्रकल्प, शेतीमाल सहकारी प्रक्रिया संस्था लि., मार्केट यार्ड, कोल्हापूर या संस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, संचालक आणि व्यवस्थापक यांची नावे व रहिवासाचा पत्ता मिळणेबाबत माहिती

## विवेचन

चेअरमन, इथेनॉल प्रकल्प, शेतीमाल सहकारी प्रक्रिया संस्था मर्यादित, मार्केट यार्ड, कोल्हापूर या संस्थेबाबतची माहिती मागणारे दोन अर्ज अपीलकर्ता यांनी चेअरमन, इथेनॉल प्रकल्प, शेतीमाल सहकारी प्रक्रिया संस्था मर्यादित, मार्केट यार्ड, कोल्हापूर व जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, कोल्हापूर यांच्याकडे केले होते. संबंधित माहिती आपल्या अभिलेखात नसल्यामुळे अर्ज संस्थेकडे वर्ग केल्याचे जन माहिती अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर यांनी श्री. जाधव यांना कळविले. त्याविरूध्दचे श्री. जाधव यांचे अपील अपिलीय प्राधिकारी तथा विभागीय सह निबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर, विभाग कोल्हापूर यांनी फेटाळले, म्हणून श्री. जाधव यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

राज्य माहिती आयोगाने दि. १३.५.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. उभय बाजूंमध्ये एकमत न झाल्याने दि. १०.७.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली.

संबंधित संस्था ही बहुराज्यीय संस्था असल्याने येथील निबंधकाचे कोणतेही नियंत्रण नाही, तथापि जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांनी माहिती देण्याबाबत संस्थेला अनेकदा कळविले आहे, असे जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर यांचे प्रतिनिधी श्री. अरूण पां. काकडे यांनी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात नमूद केले आहे, तर जिल्हा उपनिबंधकाचे नियंत्रण नाही, हे म्हणणे मान्य नसल्याचे श्री. जाधव यांनी नमूद केले आहे.

संगनमताने आपल्याला माहिती नाकारली जात आहे, आपल्या ठेवी परत करण्याचा महत्त्वाचा विषय यात गुंतला असून इथेनॉल प्रकल्प, शेतीमाल सहकारी प्रक्रिया संस्था मर्यादित, मार्केट यार्ड, कोल्हापूर यांच्याकडे अर्ज स्वीकारला जात नाही. संस्थेचा दैनंदिन कारभार, निवडणूक, लेखा परीक्षण इ. बाबींवर सहकार कायद्याच्या जिल्हा उपनिबंधकांचे नियंत्रण असते, तरीही संस्थेवर कारवाई केली जात नाही, असे श्री. जाधव यांनी आयोगाला सादर केलेल्या लेखी निवेदनात म्हटले आहे. मात्र मल्टीस्टेट को.ऑप. सोसायटीज ॲक्टखाली नोंदणी झालेल्या सहकारी संस्थेवर जिल्हा उपनिबंधकांचे नियंत्रण नसते. त्यामुळे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी संस्थेला वारंवार कळविण्याचे काम केले आहे, असे जन माहिती अधिकारी श्री. अरूण पां.काकडे व

अपिलीय प्राधिकारी डॉ. ए.बी. जोगदंड यांनी अध्यक्ष व व्यवस्थापक, शेतीमाल सहकारी प्रक्रिया संस्था मर्यादित, मार्केट यार्ड, कोल्हापूर यांना पाठविलेल्या पत्रांच्या प्रतींसह नमूद केले. ही बाब लक्षात घेता जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी हे माहिती देण्यास जबाबदार ठरत नाहीत.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. १४.८.२००९